महाराष्ट्र शासन

**डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व**

**श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर**

जिल्हा न्यायालयासमोर, सिव्हिल चौक, सोलापूर- ४१३ ००३.

Dean- 0217-2319448 ● Fax- 0217-2310766 ● email- deansolapur@gmail.com ● website- www.vmgmc.edu.in

जा.क्र.डॉवैस्मृशावैमसो/कोविड-१९/६२९९/२०२० दिनांक- २२/०५/२०२०

# जाहिरात (करार/कंत्राटी पदे)

डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर मार्फत कोरोना (कोविड-१९) विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी व इतर कोरोना रोगाच्या कामासंदर्भात ठराविक वेतनावर करार/कंत्राटी पध्दतीने पदे भरणे संदर्भात मा. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी आदेशित केले आहे मा. अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी कर्मचारी यांना कंत्राटी स्वरुपात काम करण्यास्तव स्वेच्छेने राष्ट्रीय आपत्ती निवारणासाठी दिनांक २३-५-२०२० ते २७-५-२०२० रोजी सायं. ६ वाजेपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन केले आहे.

➢ **अपेक्षित पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :**

| अ. क्र. | पद | एकत्रित ठराविक मानधन | शैक्षणिक अर्हता | एकूण पदे | वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | २०,०००/- | बीएससी, डीएमएलटी/ बीपीएमटी (शासनमान्य) | ०५ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |
| २ | औषधनिर्माता / मिश्रक | २०,०००/- | एचएससी, बी.फार्मसी /डी.फार्मसी (शासनमान्य) | ०१ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |
| ३ | ई.सी.जी. तंत्रज्ञ | २०,०००/- | बीएससी, ईसीजी कोर्स पूर्ण (शासनमान्य) | ०१ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |
| ४ | क्ष-किरण तंत्रज्ञ | २०,०००/- | बीएससी, (भौतिकशास्त्र विषयासह) / X-ray tech कोर्स पूर्ण (शासनमान्य) | ०५ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |
| ५ | शिंपी | १८,०००/- | एचएससी व टेलरिंग कोर्स पूर्ण (शासनमान्य) | ०१ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |
| ६ | परिसेविका | ३५,०००/- | बीएससी, नर्सिग /जीएनएम (शासनमान्य) व १० वर्षाचा अनुभव | ०५ | ६५ वर्षापर्यत |
| ७ | अधिपरीचारीका | २५,०००/- | बीएससी, नर्सिग/ जीएनएम (शासनमान्य) व रुग्णालयीन सेवेचा अनुभव | ४५ | खुल्या वर्गासाठी ३८ वर्षे, आरक्षित वर्गाकरीता ४३ वर्षे |

| Sr, No | Post | Total Posts | SC | ST | VJ | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिसेविका | 05 | 01 | - | - | - | - | - | - | 01 | 01 | 01 | 01 |
| 2 | अधिपरीचारीका | 45 | 06 | 03 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 09 | 08 | 04 | 10 |

**टीप-** दिव्यांग उमेदवारांना दिनांक २१-४-२०२० रोजीच्या शासन निर्णयात कोविड मध्ये कामावरुन सूट देण्याबाबत स्पष्ट सूचना दिलेल्या असल्यामुळे या रुग्णालयातील दिव्यांग कर्मचा-यांना सुटटी देण्यात आलेली आहे. त्यामुळे वरील आरक्षणातुन दिव्यांगाना वगळण्यात आलेले आहे. याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती :**

१) इच्छुक उमेदवारांनी दिनांक २३-५-२०२० ते २७-५-२०२० रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या कालावधीमध्ये फक्त ऑनलाईन पध्दतीने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या ईमेल आयडीवर सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज करावे व जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव (आवश्यक असल्यास) ही कागदपत्रे एकाच PDF फाईलमध्ये सादर करावी. मुदतीनंतर ईमेल प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. **तसेच पोस्टाद्वारे, कुरियर अथवा प्रत्यक्षात अर्ज स्वीकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

२) सदर पदांकरिता प्राप्त अर्जांमधून निवड करण्यासाठी पदव्युत्तर/शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाच्या गुणवत्तेनुसार निवड यादी लावण्यात येईल.

३) पात्र व निवड झालेल्या उमेदवारांची यादी **www.vmgmc.edu.in** या संकेतस्थळावर दिनांक ३०-५-२०२० रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

४) निवड झालेल्या उमेदवारांना कोविड रुग्णांसाठी विशेष इमरतीमध्ये (COVID BLOCK) नियुक्ती देण्यात येईल.

५) वरील सर्व कंत्राटी पदांना सुरुवातीला तीन महिन्यासाठी व त्यानंतर पुन्हा गरजेनुसार नियुक्ती देण्यात येईल. सदरील पदे एकत्रित मानधनाची असून कोविड-१९ या साथरोगाच्या कालावधी पुरतेच असल्यामुळे सदर रोगाचा साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरची नियुक्ती संपुष्टात येईल व पुढील नियुक्ती देण्यात येणार नाही.

६) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

७) आवश्यकतेनुसार सदर रिक्त पदाच्या संख्येत, सामाजिक आरक्षण यात बदल करण्याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवले आहे.

८) विहीत नमुन्यातील अर्जासोबत- १) वयाचा पुरावा (एसएससी सर्टिफिकेट, पासपोर्ट, वय व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा दाखला.), २) पदवी/पदविका प्रमाणपत्र, ३) उच्चतम शैक्षणिक अर्हतेचे गुणवत्ता प्रमाणपत्र (मार्क मेमो) ४) कौन्सील नोंदणी प्रमाणपत्र, ५) अनुभव प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार), ६) आधार कार्ड/मतदान कार्ड, ७) जात व जातवैधता प्रमाणपत्र. ८) नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र. (आवश्यकतेनुसार)

९) आवश्यकतेप्रमाणे जात व जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र (आवश्यकतेप्रमाणे) हे बंधनकारक आहे. ज्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नाही अशा उमेदवारांची गणना खुल्या प्रवर्गात करण्यात येईल.

१०) मुलाखत होणार नसल्यामुळे तसेच अर्ज ईमेलद्वारे स्वीकारण्यात येणार असल्यामुळे कोणत्याही उमेदवाराने कार्यालयास प्रत्यक्ष भेट देवू नये.

११) निवड झालेल्या उमेदवारांच्या पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत अथवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

१२) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी किंवा जास्त करणे, आरक्षणात दुरुस्ती करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे इ. सर्व अधिकार अधिष्ठाता, डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

१३) निवड झालेल्या उमेदवारांची निवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी स्वतः उमेदवाराची राहील.

१४) उमेदवारांनी या प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करावा.

- भरलेला अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसहएकाच पीडीएफ फाईलमध्ये तयार करणे.
- दिलेल्या नमुन्यामध्ये फक्त ईमेलद्वारे अर्ज करणे.
  - अनु.क्र.१, ३ व ४ या पदाकरिता अर्ज estvmgmcsolapur@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावा.
  - अनु.क्र.२ व ५ या पदाकरिता अर्ज est123ghs@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावा.
  - अनु.क्र.६ व ७ या पदाकरिता अर्ज scsmghnursingsolapur@gmail.com या ईमेलवर पाठविण्यात यावा.
- पाठविलेल्या ईमेलची उमेदवारांनी प्रिंट ठेवणे.

**अधिष्ठाता,**
डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

**डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व**
**श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर**

**कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना सन २०२०-२१**

पासपोर्ट आकाराचे अलीकडील छायाचित्र

प्रति,
मा. अधिष्ठाता,
डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

पदाचे नाव : ______________________________

१) उमेदवारांचे संपूर्ण नाव : ______________________________

२) पत्ता : ______________________________
______________________________
Mobile No-

३) जन्म तारीख : ______________ e-mail ID : ______________________________

४) शैक्षणिक अर्हता :

| धारण केलेली पदवी अर्हताचा तपशील (सर्व) | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | शेवटच्या वर्षात मिळालेले गुण | शेवटच्या वर्षातील एकूण गुण | शेवटच्या वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

५) अनुभव : अनुभवाची सांक्षाकित प्रत जोडावी (Only for those posts, where experience is asked)

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | | संपर्काकरिता दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

६) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमूद करावा)

- वयाचा पुरावा (एसएससी सर्टिफिकेट, पासपोर्ट, वय व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा दाखला.) ☐
- पदवी/पदविका प्रमाणपत्र, ☐
- उच्चतम शैक्षणिक अर्हतेचे गुणवत्ता प्रमाणपत्र (मार्क मेमो) ☐
- कौन्सील नोंदणी प्रमाणपत्र, ☐
- अनुभव प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार), ☐
- आधार कार्ड/मतदान कार्ड, ☐
- जात प्रमाणपत्र. ☐
- जात वैधता प्रमाणपत्र. ☐
- नॉन क्रिमिलेयअर प्रमाणपत्र. ☐

७) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीचे नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण : ______________ स्वाक्षरी-

दिनांक : ______________ अर्जदार-